| CNR No.MHPU130016812022 | नियमीत दिवाणी दावा क्र.३६९/२०२२<br>कलावती<br>वि.<br>विलास |
|---|---|

## निशाणी क्र. ४१ वरील आदेश

(दि. १६.०९.२०२५ रोजी पारित )

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दि.प्र.सं.चे आदेशिका ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्तीस परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, सदर दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. २ यांनी दावा मिळकत गट नं. ११९१ मधील ० हे. ३० आर क्षेत्राचा विनामोबदला बक्षीसपत्राचा दस्त दि. १६.०१.२०२४ रोजी त्यांची पत्नी सौ. रोहिणी रुपेश मोरे यांना नोंदणीकृत दस्तान्वये करुन दिलेला आहे. त्यामुळे दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक झालेले आहे. असे कथन करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी निशाणी क्र. ४३ येथे त्यांचे म्हणणे देवून आक्षेप नोंदवून असे कथन केले आहे की, वादी यांनी मुळ दावा अग्रहक्क व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदर मिळकतीबाबत अस्तित्वात आणलेल्या बक्षीसपत्राच्या दस्ताबाबत सदर दस्त आव्हानित करणेकामी वादी यांनी कोणतेही मागणी केलेली नाही. दाव्यातील उणीवा भरुन काढण्याचे हेतूने अर्ज दिला आहे. असे कथन करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी तर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. या ठिकाणी वादीचे असे कथन आहे की, सदर दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. २ यांनी दावा मिळकत गट नं. ११९१ मधील ० हे. ३० आर क्षेत्राचा विनामोबदला बक्षीसपत्राचा दस्त दि. १६.०१.२०२४ रोजी त्यांची पत्नी सौ. रोहिणी रुपेश मोरे यांना नोंदणीकृत दस्तान्वये करुन दिलेला आहे. वादीने तिच्या अर्जाच्या पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र दिले आहे. वादी सदर बक्षीसपत्राच्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करु इच्छीत आहेत. सदरील अर्जामध्ये नमूद केलेल्या मजकूराबाबत दुरुस्ती करण्यास परवानगी देणे दाव्याच्या पुढील कार्यवाहीसाठी आवश्यक आहे. अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, वरील विवेचनाचा विचार करुन खालील आदेश पारीत करत आहेः–

नि.दि.दा.क्र. ३६९/२०२२
कलावती वि. विलास

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत प्रस्तावित दुरुस्ती करावी.

RAVINDRA ANANDRAO SAWANT
Digitally signed by RAVINDRA ANANDRAO SAWANT
Date: 2025.09.16 15:36:14 +0530

( रविंद्र आ. सावंत )

दिनांकः १६.०९.२०२५ — २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

सासवड. — सासवड.